# धर्मनिरपेक्षता आणि भारतीय लोकशाही

**प्रा.डॉ.पी.एस.लोखंडे**, सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय परभणी–४३१४०१. Mob.9503423924 Email: lokhps@gmail.com

---

२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान देशासाठी लागू करण्यात आले आणि भारत हा एक 'प्रजासत्ताक गणराज्य' देश बनला, म्हणजे खऱ्या अर्थाने भारतामध्ये लोकांची सत्ता निर्माण झाली. कारण भारतीय संविधानाने या देशाची अंतिम सत्ता जनतेच्या हातामध्ये दिलेली होती. संविधानातील तरतुदीनुसार या देशाचा सर्वोच्च शासनप्रमुख प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने जनतेद्वारे निवडण्यात येईल.भारतीय संविधानाची सुरूवातच '**We the people of India**'या वाक्याने झालेली आहे. १३ डिसेंबर १९४६ मध्ये संविधान समितीची पहिली बैठक भरविण्यात आली. या बैठकीमध्ये भारताचे तत्कालिन पंतप्रधान व संविधान समितीचे सदस्य श्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संविधान समितीसमोर उद्दिष्टांचा ठराव मांडला आणि त्यास सर्वांनी एकमताने मान्यता दिली.अत्यंत विचार करून व दूरदृष्टी ठेवून संविधान निर्मात्यांनी भारताला एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र बनविले आणि संविधानामध्ये अशाप्रकारची स्पष्ट तरतूद करण्यात आलेली आहे की, भारत हे एक **धर्मनिरपेक्ष** (India will be a secular state) राष्ट्र असेल, याचा अर्थ सरकारसाठी सर्वधर्म समान असतील,सरकार कोणत्याही धर्माला विशेष महत्त्व देणार नाही किंवा कोणत्याही धर्माचा द्वेष देखील करणार नाही. धर्माच्या बाबतीमध्ये सरकारची भूमिका तटस्थ व न्यायपूर्ण अशाप्रकारची राहील .परंतु दुर्दैवाने नंतरच्या काळामध्ये अनेक राजकीय पक्षांनी आणि काही राजकीय नेतृत्वानेदेखील आपणास राजकीय लाभ प्राप्त करण्यासाठी धर्माचा व जातीचा आपल्या सोयीनुसार वापर केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. दुर्दैवाने निवडणुकीची रणनिती धर्म व जातीवर आधारित बनविण्यात येत आहे.मागील काही दशकापासून दुर्दैवाने भारतीय लोकशाहीमध्ये धर्मनिरपेक्षता धोक्यात आल्याचे स्पष्टपणे दिसतआहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धर्माच्या नावावर लोकांमध्ये ध्रुवीकरण करणे आणि त्याचा राजकीय लाभ प्राप्त करणे हे जनु काही निवडणुका जिंकण्याचे सूत्र बनत चालले आहे. जवळपास यास कोणताही राजकीय पक्ष अपवाद नाही असे म्हणावे लागेल.

संविधान समितीचे कामजेव्हा प्रगतीपथावर होते त्या वेळेला अनेक सदस्यांनी अशाप्रकारची मागणी केली होती की, भारताला हिंदू राष्ट्र म्हणून घोषित करा, परंतु भारताला हिंदू राष्ट्र म्हणून घोषित करणे हे परवडणारे नव्हते कारण जगातील सर्व प्रमुख धर्मांचे अस्तित्व भारतामध्ये आहे. त्याचबरोबर त्या धर्माअंतर्गतयेणार्या विविध जाती सुद्धा अस्तित्वात आहेत आणि भारतामध्ये सर्वचबाबतीमध्ये प्रचंडविविधता दिसून येते. जर या देशांमध्ये एखादा विशिष्ट धर्म राष्ट्रीय धर्म म्हणून आपण स्वीकारला तर निश्चितपणे इतर अल्पसंख्याकांच्या मनामध्ये एकप्रकारे भीतीचे वातावरण निर्माण झालेअसते. त्यामुळेच संविधान समितीने दूरदृष्टीचा विचार करून भारताला एक

धर्मनिरपेक्ष राष्ट्र बनविलेच्या दशकापासून १९८० भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर . .धर्मनिरपेक्षतेला मोठे आव्हान मिळू लागले अनेक राजकीय पक्ष निवडणुकीमध्ये राजकीय लाभ प्राप्त करण्यासाठी काही संकुचित, भावनिक, धार्मिक मुददयांना आपल्या ध्येयधोरणांमध्ये स्थान देत आहेत

भारतामध्ये काही दिवसांपूर्वी पाच राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या या निवडणुकीच्या दरम्यान कर्नाटक राज्यामध्ये एक दुर्दैवी घटना घडली. एका खाजगी शाळेमध्ये गणवेशावरून वाद झाला. काही मुस्लीम विद्यार्थिनींनी शाळेचा गणवेश घालण्याऐवजी हिजाब वापरण्यास परवानगी मिळावी ,अशा प्रकारची विनंती केली.परंतु शाळेच्या प्रशासनाने त्या मुस्लिम विद्यार्थीनीना हिजाब घालून शाळेमध्ये येण्यास स्पष्टपणे नकार दिला. त्यामुळे शाळेचे प्रशासन आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड वाद झाला. त्याचा परिणाम असा झाला की, काही इतर धर्मीय विद्यार्थीनी सुद्धा आम्हाला सुद्धा धार्मिक पेहराव वापरण्यास परवानगी द्यावी, अशी विनंती केली यावरून दोन्ही बाजूंनी प्रचंड वाद झाला आणि शेवटी हे प्रकरण उच्च न्यायालयामध्ये गेले. परंतु या घटनेचा परिणाम या पाचही राज्यांच्या विधानसभा निवडणुकीवर झालेला दिसून येतो.काही राजकीय पक्षांनी जाणीवपूर्वक निवडणुकीच्या प्रचारामध्ये कर्नाटकमधील हिजाब प्रकरणाचा उल्लेख वारंवार केला. याचा थेट परिणाम मतदारांवर झाला.काही राज्यांमध्ये तर या प्रकरणावरून कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थितीसुद्धा धोक्यांमध्ये आली होती.अशाप्रकारे भारताच्या विविध निवडणुकीमध्ये कर्नाटकमधील हिजाब प्रकरण हे एकमेव उदाहरण नाही तर असे अनेक उदाहरणे आपणाला सांगता येतील, ज्यामुळे भारतातील धर्मनिरपेक्षतेला मोठा आघात झाल्याचे दिसून येते.वर्तमान परिस्थितीमध्ये भारतीय लोकशाहीचे भवितव्य सुरक्षित करायचे असेल तर धर्मनिरपेक्ष तेची संकल्पना सर्व राजकीय पक्षांनी जपणे आवशकत आहे.

संदर्भ -:

१ .डॉ-भोळे भा .ल. भारतीय गणराज्याची शासन पद्धती

२ .डॉ-अलका देशमुख भारतीय शासन आणि राजकारण

3 Indian Democracy—S.K.Kulkarni

4 Indian Express